# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 13/01/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत मौजा नक्षी रोड भिवापुर येथे दिनांक 12/01/2021 चे 01.00 वा. ते 02.00 वा. दरम्यान आरोपी नामे– सुनिल श्रीकृष्ण घरत, वय 24 वर्ष, रा. पिरावा ता. उमरेड याने फिर्यादी नामे– अंकीत गणपत नागोसे, वय 20 वर्ष, रा. दिघोरी ता. भिवापुर यांच्या पानठेल्याचे कुलुप तोडुन पानठेल्याच्या आत मधुन सिगारेट कि. 1,980/–रू. व गल्लयातुन चिल्लर कि. 250/–रू. असा एकुण किमंती 2,230/–रू. चा माल तसेच आरोपीने पुरूशोत्तम भुते यांच्या पानठेल्यातुन 300/–रू. चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380, 511 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार चंद्रकांत रेवतकर 9823719197 हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 02 किमी अंतरावर मौजा शिवधाम खापा कन्हान नंदीचे पात्र येथे दिनांक 12/01/2021 चे 11.30 वा. दरम्यान विना क्रमांकाचा आयसर कंपनीचा सिल्वर रंगाचे ट्रॅक्टर व विना क्रमांकाचा ट्रॉलीचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 3,000/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण कि. 3,03,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई समाधान पवार पो.स्टे. खापा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार श्री अशोक ठाकुर 9823426310 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर